तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित पुस्तक प्रकाशन समारंभात बोलताना डॉ. यशवंतराव थोरात. व्यासपीठावर डॉ. भारती पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि लेखिका रिटा राममूर्ती गुप्ता.

# जातीव्यवस्था नष्ट करण्यातील अपयश चिंताजनक

- ज्येष्ठ विचारवंत, अर्थतज्ज्ञ डॉ. यशवंतराव थोरात यांची खंत
- शिवाजी विद्यापीठात रिटा गुप्ता यांच्या सावित्रीबाई फुलेंवरील इंग्रजी पुस्तकाचे प्रकाशन

प्रतिनिधी
कोल्हापूर

महात्मा जोतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले या दांपत्याने शूद्रातिशूद्रांना शिकवून जातीव्यवस्थेवर प्रखर आघात केला; मात्र आज दोनशे वर्षे उलटल्यानंतरही जातीव्यवस्था उद्ध्वस्त करण्यात आपण यशस्वी झालेलो नाही, हे चिंताजनक आहे, अशी खंत ज्येष्ठ विचारवंत व अर्थतज्ज्ञ आणि नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंतराव थोरात यांनी आज येथे व्यक्त केली.

'सावित्रीबाई फुलेः हर लाईफ, हर रिलेशनशीप, हर लिगसी' या पुस्तकाचे प्रकाशन गुरूवारी शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात झाले. रिटा राममूर्ती गुप्ता यांनी सावित्रीबाई फुले यांच्याविषयी लिहिलेल्या या पहिल्या इंग्रजी पुस्तकाचे प्रकाशन कै. श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनाच्या वतीने करण्यात आले. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. थोरात बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. थोरात म्हणाले, फुले दाम्पत्याने पावणेदोनशे वर्षापूर्वी शूद्रातिशूद्र व स्त्रिया यांच्यासाठी शिक्षणाची दारे खुली करून जातीच्या उतरंडीला आव्हान दिले. पण अजूनही आपली जातमानसिकता बदललेली नाही.

### लेखिका रिटा गुप्तांनी सांगितली पुस्तक निर्मितीचे कारण

डॉ. थोरात यांनी काही प्रश्न विचारून लेखिका रिटा राममूर्ती गुप्ता यांना बोलते केले. सावित्रीबाईंविषयीच पुस्तक लिहावे, असे का वाटले? या त्यांच्या प्रश्नाला उत्तर देताना गुप्ता म्हणाल्या, सावित्रीबाईंनी तर लहान असतानाच नायगावमध्ये अगदी एकलव्याप्रमाणे शिकण्याचा प्रयत्न चालविलेला होता. म्हणजे तेव्हापासूनच शिकण्याची ऊर्मी त्यांच्यात होती आणि पुढचा इतिहास घडला. कुलगुरु डॉ. शिर्के म्हणाले, सावित्रीबाईंनी त्यांच्या पहिल्या फळीच्या विद्यार्थिनींवर जो शिक्षणाचा संस्कार केला, प्रभाव टाकला, त्या अनुषंगाने संशोधन होणे हे आवश्यक आहे. अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाला बाळ पाटणकर, इंद्रजीत घोरपडे, आरबीआयच्या माजी डेप्युटी गव्हर्नर डॉ. उषा थोरात, डॉ. बी. एम. हिर्डेकर, डॉ.अरूण शिंदे, डॉ. केशव हरेल व शिक्षक, विद्यार्थी–उपस्थित होते.

21 OCT 2023
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील संख्याशास्त्र अधिविभागात जनगणना माहिती संशोधन कार्य केंद्र साकारण्यात आले आहे.

## संशोधकांना मिळणार अधिकृत आकडेवारी : धोरणाचा अभ्यास करता येणार

# विद्यापीठात 'जनगणना माहिती केंद्र'

▶संतोष मिठारी : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठातील संख्याशास्त्र अधिविभागात जनगणना माहिती संशोधन कार्य केंद्र साकारले आहे. केंद्र सरकारचे जनगणना निदेशालय आणि राज्य शासनाच्या मार्गदर्शनाखाली हे केंद्र कार्यान्वित असेल. येथे जनगणनेची माहिती आकडेवारीसह उपलब्ध होईल. त्याने सामाजिक घटकांशी संबंधित संशोधनाला आणि धोरणाचा अभ्यास करण्यासाठी संशोधकांना माहितीचा खजिना खुला होईल.

आर्थिक, सामाजिक प्रश्नांवर संशोधन करणाऱ्यांना जनगणनेमधून उपलब्ध माहिती उपयुक्त ठरते. विविध समस्यांचा उलगडा करण्यासह उद्योग-व्यवसायाचे योग्य नियोजन करण्यात मदत होते. त्यामुळे जनगणना निदेशालयाने प्रत्येक राज्यात जनगणना माहिती संशोधन कार्य केंद्र सुरू केले. विद्यापीठ केंद्र सुरू करण्यास इच्छुक आहे का? अशी विचारणा निदेशालयाने वर्षभरापूर्वी केली होती. त्याबाबत विद्यापीठाने सकारात्मक तयारी दाखविली. त्यानंतर सहा महिन्यांत आवश्यक सुविधांची पूर्तता करून विद्यापीठाने केंद्र साकारले. तेथे जनगणनेमधील कृषी, उद्योग, शैक्षणिक, आरोग्य, साक्षरता, राहणीमान, अन्नधान्य पुरवठा आदी क्षेत्रांतील संख्यात्मक माहिती उपलब्ध असेल.

माहिती घेऊन विश्लेषण करता येणार जनगणनेतील माहिती सहजपणे उपलब्ध होत नव्हती. मात्र, विद्यापीठातील केंद्रात जनगणनेतील सरकारने सार्वजनिकरित्या उपलब्ध करून दिलेली माहिती मिळेल. ही माहिती घेऊन त्यावर संशोधनाच्या अनुषंगाने संशोधक विद्यार्थी, प्राध्यापकांना विश्लेषण करता येईल. त्यासाठी संगणक आणि इतर पायाभूत सुविधा केंद्रात उपलब्ध आहेत.

### नोव्हेंबरमध्ये केंद्र खुले होणार

■ नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात विद्यापीठ आणि राज्य जनगणना निदेशालय यांच्यात सामंजस्य करार होईल. या करारानंतर विद्यापीठातील हे केंद्र कार्यान्वित होईल. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील संशोधकांना या केंद्राची मोठी मदत होणार असल्याचे या केंद्राचे आणि संख्याशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. एस. बी. महाडिक यांनी सांगितले.

" जनगणना माहिती संशोधन कार्य केंद्रातून सर्व क्षेत्रातील संशोधकांना जनगणनेतील संख्यात्मक माहितीचा खजिना उपलब्ध होणार आहे. संशोधन आणि धोरणांचा अभ्यास करणे, त्यामध्ये बदल सुचविण्यासाठी मदत होणार आहे. समाज आणि विद्यापीठाच्यादृष्टीने हे केंद्र महत्त्वाचे ठरणार आहे.

**-डॉ. दिगंबर शिर्के,**
कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

पुढारी

# ‘अस्मिता’ संशोधक विद्यार्थिनी वसतिगृहाचे सोमवारी उद्घाटन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ परिसरात नव्याने उभारण्यात आलेल्या ‘अस्मिता’ संशोधक विद्यार्थिनी वसतिगृहाचा उद्घाटन समारंभ सोमवार (दि. २३) रोजी दुपारी ३.३० वाजता कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते व प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. समारंभास उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

सकाळ



सावंतवाडी (गर्जन) : येथे शिवाजी विद्यापीठांतर्गत गावसहभागी मूल्यावलोकन शिबिराची सुरुवात रोपाला पाणी घालून करताना मान्यवर.

# शिवाजी विद्यापीठांतर्गत सावंतवाडीत शिबिर

शिरोली दुमाला : शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट अधिविभागाच्या समाजकार्य अभ्यासक्रमांतर्गत गावसहभागी मूल्यावलोकन शिबिर सावंतवाडी (गर्जन ग्रामपंचायत, ता. करवीर) येथे झाले. समन्वयक प्रा. डॉ. उर्मिला दशवंत यांनी शेती, पिके, मृदा आणि समस्यांचा अभ्यास करून मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक अर्जुन तांदळे, दीपक दगरखैर, ग्रा. पं. सदस्य जग्गनाथ सावंत, विठ्ठल सावंत, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष वसंत सावंत, ज्योती सावंत, रेश्मा सावंत, प्रदीप सावंत, मोहन सावंत, मारुती सावंत, बंडू सावंत उपस्थित होते. शिबिरात प्रीती कांबळे, शाहीन पाटील, स्वाती राऊत, आश्विनी खोत, योगिता मस्कर, पायल कांबळे, प्रेम भोसले, स्वप्निल बारवाडे, गौरव दाभाडे हे विद्यार्थी सहभागी झाले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षांना प्रारंभ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षांना प्रारंभ झाला आहे. १८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालये व अधिविभागांमध्ये सुरळीतपणे झाल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षांना प्रारंभ झाला आहे. शुक्रवारी बॅचलर ऑफ डिझाईन, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, बॅचलर ऑफ व्होकेशन (ॲग्रीकल्चर, फूड प्रोसेसिंग अँड मॅनेजमेंट, प्रिंटिंग अँड पब्लिशिंग, रिटेल मॅनेजमेंट), बॅचलर ऑफ शुगर टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या.

परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. सातारा जिल्ह्यातून तीन गैरप्रकारांची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी परीक्षेचे पावित्र्य राखावे, असे आवाहन परीक्षा विभागाने केले आहे.

लोकमत

# विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षा सुरू

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षांना प्रारंभ झाला. बॅचलर ऑफ डिझाइन, इंटेरिअर डिझाइन, हॉर्टिकल्चर सायन्स अॅण्ड टेक्नॉलॉजी यासह १८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा विविध महाविद्यालये व अधिविभागामध्ये पार पडल्या. गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके आहेत. सातारा जिल्ह्यात तीन गैरप्रकार आढळले. विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले.

पुढारी



कोल्हापूर : मध्यवर्ती युवा महोत्सवात अव्वल ठरलेल्या विवेकानंद कॉलेजच्या विजयी संघासमवेत संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे. सोबत प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. आरिफ महात आदी.

# शिवाजी विद्यापीठ युवा महोत्सवात १५ वर्षे विवेकानंद कॉलेज अव्वल

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या दहिवडी (जि. सातारा) येथे झालेल्या ४३ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवात विवेकानंद कॉलेजने विविध १५ कला प्रकारात पुरस्कार मिळवून अव्वल येण्याचा बहुमान पटकावला. अभिजीत कदम सांघिक स्पर्धा, जनरल चॅम्पियनशीप फिरता चषक, संगीत विभाग फिरता गौरव चषक, नाट्य विभाग फिरता गौरव चषकाचा समावेश आहे.

महोत्सवात शास्त्रीय नृत्य- प्रथम, एकपात्री अभिनय- तृतीय, पाश्चिमात्य एकल गायन- प्रथम, शास्त्रीय सूरवाद्य - तृतीय, पाश्चिमात्य एकल वादन- द्वितीय, स्थळ छायाचित्रण- प्रथम, व्यंगचित्र - तृतीय, हिंदी वक्तृत्व - द्वितीय, लोककला - तृतीय, एकांकिका - तृतीय, सर्वोत्कृष्ट स्त्री अभिनय एकांकिका - प्रथम, लघुनाटिका- प्रथम, पथनाट्य- प्रथम, भारतीय समूहगीत - प्रथम, लोकसंगीत वाद्यवृंद- प्रथम, प्रश्नमंजुषा- द्वितीय या कलाप्रकारात पारितोषिके प्राप्त केली. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार केला. सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. आरिफ महात, डॉ. वर्षा पवार, डॉ. राजश्री पाटील, प्रा. एस. एस. कदम, प्रा. संदीप पाटील, प्रा. सतीश उपळावीकर, संगीत शिक्षक महेश हिरेमठ यांच्यासह संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

पुढारी

# विशाल बराले, श्रेया बराले यांना सुवर्णपदक

कोल्हापूर : जयसिंगपूर येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ झोनल तायक्वांदो स्पर्धेत विवेकानंद कॉलेजच्या विशाल बराले याने ८९ किलो वजन गटाखाली सुवर्णपदक व श्रेया बरालेने ४६ किलो वजन गटाखाली सुवर्णपदक मिळविले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी अभिनंदन केले. खेळाडूंना जिमखाना प्रमुख प्रा. हवालदार, एन. आर. सणगर, प्रा. सहिदा कच्छी, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रशिक्षक विश्वास बराले यांचे मार्गदर्शन लाभले.

21 OCT 2023
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मंडलिक महाविद्यालय, डी. आर. माने, देवचंद कॉलेज उपांत्य फेरीत

- विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धेला मुरगूडात प्रारंभ

वार्ताहर

मुरगूड

शिवाजी विद्यापीठांतर्गत, कोल्हापूर विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धेला मुरगूडात शानदार प्रारंभ झाला. येथील जय शिवराय एज्युकेशन सोसायटी संचलित सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयाच्या वतीने शिवराज हायस्कूलच्या व्हॉलीबॉल मैदानावर या स्पर्धा सुरू आहेत.

दोन दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत मुरगूडचे मंडलिक महाविद्यालय, एस. के. पाटील कॉलेज (कुरुंदवाड), डी. आर. माने कॉलेज (कागल) आणि देवचंद कॉलेज (अर्जुन नगर) हे संघ उपांत्य फेरीत पोहचले.



**मुरगुड : शिवाजी विद्यापीठांतर्गत कोल्हापूर विभाग पुरुष गटातील व्हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन प्रसंगी कार्यवाह आण्णासो थोरवत, प्राचार्य डॉ. अर्जुन कुंभार, एन. आंगज, डॉ. शिवाजी पोवार.**

स्पर्धेचे उद्घाटन जय शिवराय एज्युकेशन सोसायटीचे कार्यवाह आण्णासो थोरवत यांच्या हस्ते प्राचार्य डॉ. अर्जुन कुंभार, उपप्राचार्य डॉ. टी. एम. पाटील, शिवराजचे प्राचार्य पी. डी. माने, प्रा. एस. एन. आंगज, डॉ. शिवाजी होडगे, माजी प्राचार्य महादेव कानकेकर, उपमुख्याध्यापक रवींद्र शिंदे, प्रा. सुहास वाघ, प्रा. किरण पाटील, संभाजी मांगले, उपप्राचार्य एल. व्ही. शर्मा, प्रा. आर. जी. पाटील आदींच्या प्रमुख उपस्थितीत झाले. या स्पर्धेत कोल्हापूर जिल्ह्यातील १६ वरिष्ठ महाविद्यालयाचे व्हॉलीबॉल संघ सहभागी झाले आहेत. या स्पर्धेतून प्रथम येणारे चार संघ वडूज (सातारा) येथे होणाऱ्या आंतरविभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरणार आहेत.

राष्ट्रीय पंच महेश शेडबाळे, भालचंद्र आजरेकर, प्रवीण मोरबाळे, संजय पाटील, संग्राम तोडकर, दिपक चव्हाण, विनोद रणवरे, अनिल देवडकर यांनी काम पाहिले.